Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,**
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,
www.unishivaji.ac.in

# विद्यार्थी विकास विभाग

**Phone – (0231) 2609175, 2609475**
**Email: dsw@unishivaji.ac.in**

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/२७९ दि. १०/०२/२०२५

प्रति,
**मा. अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक,**
सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**मा. विभागप्रमुख,**
सर्व प्रशासकीय विभाग
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

**विषय : शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभागी होणेबाबत....**

महोदय/महोदया,

आपणास विदितच आहे कि या विभागामार्फत दि. २३ ते २५ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत प्रतिवर्षी प्रमाणे विद्यापीठ परिसरातील विद्यार्थ्यांसाठी **शिवस्पंदन २०२४–२०२५** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने विद्यापीठ परिसरातील शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्यासाठीही सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे अशी मागणी शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचेकडून करण्यात येते होती. त्यानुसार शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर कार्यक्रम **दि. २४ फेब्रुवारी, २०२५ रोजी संध्याकाळी ६.०० ते ८.००** या वेळेत राजर्षी शाहू सभागृह येथे आयोजित करण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमामध्ये खालील कलाप्रकारांचा समावेश करण्यात आलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| १. अभिवाचन | २. काव्यवाचन | ३. एकपात्री |
| ४. गायन | ५. एकल नृत्य | ६. समूह नृत्य |
| ७. लघुनाटिका | ८. नकला | |

तरी सदर कार्यक्रमामध्ये आपण स्वत: व आपल्या अधिविभागातील जे शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी सहभागी होऊ इच्छीतात त्यांनी खाली नमुद केलेल्या गुगल लिंकमध्ये आपली माहिती दि. १८/०२/२०२५ पर्यंत भरण्याबाबत सुचना देण्यात याव्यात. तसेच सदर कार्यक्रमामध्ये जास्तीत जास्त शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांना सहभागी होण्याबाबत प्रोत्साहन देण्यात यावे हि विनंती. सदर कार्यक्रमामध्ये अधिविभागातील शिक्षक व नियमित सेवेतील प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी सहभागी होवू शकतात. रोजंदारी प्रशासकीय कर्मचारी यांना सहभागी होता येणार नाही.

गुगल लिंक : https://forms.gle/PixjAS3XuopE5feu8

कळावे,

आपला विश्वासू

10/02/25

**समन्वयक**
**शिवस्पंदन २०२४–२०२५**

**संचालक**
**विद्यार्थी विकास**